## अंक - २



# गंमत जम्मत

(वर्ग: ४ आणि ५)

IGNUS
KNOWLEDGE EMPOWERS

SAVE
The Children India
FOUNDED BY MRS. VIPULA KADRI IN 1988

educo
Member of ChildFund Alliance

# गंमत जम्मत पुस्तिका बद्दल

- **"गंमत जम्मत" पुस्तिका का बनवली आहे?**
  चालू शैक्षणिक वर्षात (२०२०-२१) शाळा नेहमीसारख्या सुरु झाल्या नाहीत, कारण सध्याच्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सर्वदूर पसरला आहे. सर्वांची सुरक्षा पाहता शाळा जरी बंद असल्या तरी शिक्षण सुरु आहे. विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी जी काही साधने आहेत, जसे कि वॉट्सअँप आणि एस एम एसचा उपयोग केला जात आहे. "गंमत जम्मत" ही पुस्तिका बनवणे, त्याची छपाई आणि वितरण देखील मुलांपर्यंत पोहोचण्याचा एक प्रयत्न आहे.

- **"गंमत जम्मत" पुस्तिका कायआहे?**
  विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार त्या इयत्तेतील कौशल्ये आत्मसात करण्यासाठी पूरक साहित्य म्हणून हि "गंमत जम्मत" पुस्तिका आहे. कृती करण्यात मुलांचा सहभाग, आवड आणि मनोरंजन सोबत अध्ययन निष्पत्ती आणि काठीण्यपातळीकडे पण लक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे.

- **"गंमत जम्मत" पुस्तिकाचे स्वरूप कसे आहे?**
  - मुलांना हे साहित्य कार्यपत्रिका (वर्कशीट) स्वरुपात दिले आहे.
  - पुस्तिकेमध्ये दिलेल्या कृती सोबत दिलेल्या वहीत सोडवायच्या आहेत.
  - पुस्तिका दोन स्तरानुसार बनवण्याचा प्रयत्न केला आहे (वर्ग १ ते ३, वर्ग ४ आणि ५).
  - घरात व स्थानीय परिसरात सहज उपलब्ध वस्तूंचा उपयोग होईल असे प्रश्न आणि कृती यामध्ये समाविष्ट केल्या आहेत.
  - पुस्तिकेतील वर्कशीट्स शाळेच्या नियमित अभ्यासाची उजळणी (अगोदर शिकलेल्या भागाची) काही नवीन शिकणे, सराव आणि दृढीकरणासाठी सहाय्यक ठरू शकतील.

मुलांना या पुस्तिकेचा कसा उपयोग होत आहे हे जाणण्याकरिता पुस्तिकेच्या शेवटी एक सारणी दिली आहे. जसे-जसे मुलं कृती करतील, त्या सारणीत कृती समोर केल्याची खूण करून दिनांक लिहावे. त्याच बरोबर कृती विषयी दिलेले प्रश्नांबद्दल आपले प्रतिसाद लिहून कळवावे अशी विनंती.

मुलांना दिलेल्या कृतीमध्ये काय आणि कसे करायचे हे समजण्यासाठी घरातल्या मोठ्यांची मदत लागू शकेल.
याकरीता, पुस्तिकेत काही चिन्ह दिले आहेत:


मुलांनी वहीमध्ये लिखाणकाम करावे


मुलांनी स्वतः वाचून सांगितलेले करावे


मोठ्यां सोबत/पालकांनी वाचून समजवावे


पालकांनी कृतीत मदत करावी

आशा आहे की मुलं ह्या पुस्तिकामध्ये सुचविलेल्या कृतींचा आनंद घेतील. आम्ही आपल्याकडून याबद्दल ऐकण्यासाठी उत्सुक आहोत. तुम्हाला यातील कोणत्या गोष्टी आवडल्या आणि कुठे बदल किंवा सुधार करण्याची गरज आहे, असे वाटते, ते आम्हाला नक्की कळवा. यासाठी किंवा कृतीबद्दल तुमचे प्रश्न असतील तर आमच्या टीमबरोबर खाली दिलेल्या फोन वर संपर्क साधावे.

| वार | वेळ | संपर्क करावयाच्या व्यक्तीचे नाव | फोन नंबर |
|---|---|---|---|
| सोमवार, मंगळवार | सायंकाळी 4 ते 7 | भाविका नेमाडे | 8888893965 |
| बुधवार, गुरुवार | सायंकाळी 4 ते 7 | भारती मेटांगे | 9604797117 |
| शुक्रवार, शनिवार | सायंकाळी 4 ते 7 | सविता ठोंबरे | 9766588023 |

## यात काय आहे?

| क्र. | कृतीचे नाव | वर्णन / माहिती |
|---|---|---|
| १. | ओळखा पाहू मी कोण? | दिलेल्या माहितीवर विचार करून कोडी सोडवणे व बनवणे. |
| २. | चला धावा | विशिष्ट परिस्थितीत घडणाऱ्या प्रसंगावर आधारित कृती व प्रतिक्रिया. |
| ३. | A LONG RIDE | एका शब्दाच्या आधारे शब्द डोंगर तयार करणे. व त्यातून वाक्यरचना करण्याची कृती. |
| ४. | सरळ च्या उलट | दिलेल्या वाक्याला त्याच्या विरुद्ध अर्थाने पूर्ण करण्याची कृती. |
| ५. | LETTER MATHS – गणिताचा खेळ | इंगजी अक्षराला दिलेला अंक लक्षात घेऊन गणिती क्रिया करण्याची कृती. |
| ६. | आकार व चित्रांची मज्जा | आकार लक्षात घेऊन चित्र काढणे व गोष्ट तयार करणे. |
| ७. | गणिताची डोकेबाजी | मुलभूत गणितीय क्रियांचा सराव. |
| ८. | असे चालत राहते कोण? | आजूबाजूच्या परिसरामध्ये एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या गोष्टींची माहिती. |
| ९. | माझा दिवस | आपल्या दिनचर्येवरून घड्याळाविषयी जाणून घेणे. |
| १०. | हे काय आहे? | विविधचित्रांच्या आधारे कल्पना करून कथालेखन करणे. |
| ११. | PARTS OF THE TREE | कोड्याच्या माध्यमातून झाडाच्या अवयवाची माहिती घेणे. |
| १२. | मी वार्ताहर | दिलेल्या जाहिरातीचा अभ्यास करून नवीन जाहिरात बनवण्याविषयी माहिती. |
| १३. | कागद काम | विविध आकार लक्षात घेऊन वेगवेगळे चित्र बनवण्याची कृती. |
| १४. | पिण्याचे पाणी | नैसर्गिक स्त्रोतांचा काटकसरीने वापर कसा करावा या विषयी माहिती. |
| १५. | बाटली पासून काय काय? | टाकाऊतून टिकाऊ काम करण्याची कृती. |
| १६. | सात शेपट्यांचा उंदीर | मनोरंजक गोष्टीतून चांगले वाईट शिकणे. |
| १७. | केव्हा काय बोलायचे? | विविध प्रसंगी आपण काय बोलायचे आणि काय नाही बोलायचे. |

## १. ओळखा पाहू मी कोण?

**(ओळखा माझे नाव आणि चित्र काढा)**

मला लाल रंगाची चोच आहे. माझे पंख हिरव्या रंगाचे आहेत.सांगा पाहू मी कोण?

______________________________________

मला दोन चाके आहेत. मी ट्रिंग ट्रिंग आवाज करतो.

______________________________________

मी पांढरा आहे. मी लिहिण्याकरिता उपयोगी येतो.

______________________________________

मला चार पाय आहे. माझा वापर बसण्यासाठी होतो.

______________________________________

मी पाण्यामध्ये राहतो.माझी पाठ खूप कठीण असते. मी खूप हळूहळू चालतो.

______________________________________

- **अशाच प्रकारची कोडी तुम्ही बनवू शकता का? बनवली तर इथे लिहा?**
- **तुम्ही लिहलेल्या उत्तरापासून एक गोष्ट तयार करा व त्याची चित्रे सोबत दिलेल्या वही मध्ये काढा.**

## २. चला धावा

मुले झाली गोळा पहा

मोजली तेव्हा भरली _____

म्हणाली आता चला धावा

दहा मुले लागली धावू

मुले म्हणाली काय झाले पाहू





एकाच्या पायाला लागला दगड

नऊ मुले लागली धावू

तो म्हणाला द्या थोडी मला सवड

तेवढ्यात झालेली गोष्ट पाहू

कुत्र्याच्या पिल्लाला होते लागले

सोहम ने त्याला दवाखान्यात आणले

आता मुले उरली ______

तेवढ्यात दुखू लागली सागरची पाठ

आणली लगेच त्याच्यासाठी खाट

आराम कर आम्ही बघतो तुझी पुढे वाट

_____ मुलांनी सरू केले धावणे

कल्याणीच्या घरी आले पाहुणे

गेली पाहुण्यांना घरी सोडायला

अन बाबांना निरोप पोहोचवायला





आता उरली मुले _____

ज्ञानेश्वरी म्हणते इथे राहा

देवळाचा परिसर स्वच्छ करते

आणि मी नंतर येते

उरली मुले आता _____

आरतीच्या पायाला लागली काच

घरी गेली लावायला हळद

बाकीचे मुले गेली पुढे पळत

_____ मुले लागली धावू

त्यांची झालेली गम्मत पाहू

तोडली सगळ्यांनी भेंडी ताजी

नमु गेली तिकडे द्यायला...होती तिथे आजी

धावू लागली मुले आता _____

काजलची पडली रस्त्यामध्ये पीन

ती गेली शोधायला मागे

बाकीच्यांना म्हणाली तुम्ही व्हा पुढे





आता मुले उरली _____

कार्तिकला सापडला एक फोन

फोन द्यायला तो गेला

आणि सगळ्यांना घेऊन येतो म्हणाला

यश आता एकटा उरला

एकट्याने, पळण्यातला आनंद सरला

मग सगळे झाले गोळा

मिळून सारे चला रे पळा

## कोण कोण का मागे पडले सांगा पाहू:

 

(१) किती मुला-मुलींना लागले किंवा दुखू लागले?

(२) कविता वाचून कवितेचा परिसर कोणता असावा असे तुम्हला वाटते?

(३) यश जसा एकटा पडला तसे तुम्ही तुमचा मित्र एकटा पडू नये म्हणून काय कराल?

(४) तुम्हाला जर फोन सापडला तर तुम्ही काय कराल?

(५) तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांसोबत तुम्ही काय काय बोलता?

## ३. A Long Ride

मराठी विषयात जसे आपण शब्दडोंगर बनवतो उदा. आई हा शब्द घेतला तर -

**माझी आई**

**माझी आई छान आहे**

या प्रमाणे आपण एक एक शब्द वाक्य जोडून वाक्य पूर्ण करीत असतो. त्याच प्रमाणे इंग्रजीमध्ये देखील करता येऊ शकते. खाली एक उदाहरण दिले आहे.

**A red cycle**

**Riding a red cycle**

**Raju is riding a red cycle**

**Raju is Riding a red cycle to Pune**

**Raju is Riding a good red cycle to Pune**

**Raju is Riding a very good red cycle to Pune**

**Raju is Riding a very good red cycle to nearby Pune**



**आता असेच एक उदाहरण तुम्ही मराठी आणि इंग्रजी मध्ये बनवा आणि आपल्या वहीत लिहा.**

**Can you do the same below?**

**A Book - A Story Book**

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

## ४. सरळच्या उलट

**काय तुम्ही विचार केला आहे कि कोणत्या वाक्यातील एक शब्द बदलून टाकला तर त्या वाक्याचा अर्थच बदलून जातो. उदाहरण साठी एक वाक्य दिलेलं आहे.बाकी वाक्यांना तुम्ही उलट–सुलट करा एका पेक्षा अधिक वेगळे शब्द सुद्धा वापरून पहा. बघा तरी वाक्यात काय फरक पडतो.**

| | एक खूप चांगला राजा होता | एक खूप वाईट राजा होता |
|---|---|---|
| क | लोक राजाची स्तुती करीत होते. | |
| ख | त्याचे गाणे खूप सुरेल होते. | |
| ग | ती खूप खुश राहणार. | |
| घ | काय चिमणी आजारी आहे? | |
| च | तीला स्वतंत्र राहायला आवडते. | |

**असेच काही वाक्य बनवून तुम्ही या तक्त्यात लिहू शकतात.**

## ५. LETTER MATHS गणिताचा खेळ



**खाली तुम्हाला तक्त्यामध्ये काही इंग्रजी अल्फाबेट (अक्षर) दिलेले आहेत आणि प्रत्येक अल्फाबेटच्या खाली काही अंक सुद्धा दिलेले आहे.**
**काही शब्द किंवा अंक बनविण्यासाठी सूचना वाचा.**

| A | B | C | D | E | F | G | H | I | J | K | L | M | N | O |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |

१. कोणते दोन अल्फाबेट मिळवले कि १५ हा अंक तयार होतो? उत्तर – (AN)
२. कोणते दोन अल्फाबेट मिळवले कि २९ हा अंक तयार होतो?
३. कोणते तीन अल्फाबेट मिळवले कि २६ हा अंक तयार होतो? (तो एक प्राणी आहे)
४. MAN या शब्दामध्ये जेवढे अल्फाबेट आहेत त्यांची एकून बेरीज किती?
५. ३० आणि ५० मध्ये किती अल्फाबेट आहेत?

- **तुम्ही तुमच्या मित्र मैत्रीणीना अजून प्रश्न विचारण्यासाठी काही प्रश्न बनवा? आणि त्यांना उत्तरे शोधायला सांगा.**
- **तुम्ही असे काही शब्द बनवू शकता का ज्यांची बेरीज २० आणि ३० यांच्यामध्ये येईल?**
- **येथे छोट्या अंकाचे शब्द तयार करण्यासाठी तुम्ही काय केले?**
- **मराठीच्या अक्षरांसोबत सुद्धा तुम्ही असे खेळ किंवा कोडी बनवा आणि आपल्या वहीत लिहा.**

## ६.आकार व चित्रांची मज्जा

**पहिले चित्र पूर्ण करा**






**दुसरे चित्र पूर्ण करा** - हत्तीच्या डोक्यावर एक उंदीर काढा, त्याच्या कानाजवळ मांजर काढा,आणि त्याच्या पाठीवर एक कुत्रा काढा. लक्षात ठेवा कि, हे तिनही प्राणी वेगवेगळ्या आकाराचे असतात. त्यासाठी लहान-मोठा हे लक्षात ठेवा.

१. माकड आणि पोपट यांना खाली काय होताना दिसत आहे? ते पाहून दोघे काय बोलले?

२. हत्तीच्या पाठीवर हे सर्व प्राणी कसे आले? हत्तीने काय केले? लिहा किंवा दुसऱ्याला सांगा?

**आम्ही तुमच्यासाठी नवीन गोष्ट सुरु केली आहे.**

१.एके दिवशी फुलपाखरू त्याच्या मित्रांना भेटायला गेले.एक होता पोपट आणि एक होता.......................................................
............................................

२.एके दिवशी आमच्या शाळेत हत्ती आला.जेव्हा तो शाळेत घुसत होता तेव्हा.......................................................
............................................

**या गोष्टींमध्ये पुढे काय झाले असेल विचार करा आणि लिहा.**

## ७. गणिताची डोकेबाजी

१ ते ९ अंक चौकोनामध्ये असे लिहा
की आपल्या चारही क्रिया बरोबर येतील.

यामध्ये एक अंक एकदाच वापरायचा आहे.






**या मध्ये तुम्हला काही चोकोन असे दिसत आहे कि तिथे काही संख्या आहेत आणि काही चोकोनामध्ये प्रश्नचिन्ह आहे.**

१ ज्या ठिकाणी प्रश्नचिन्ह आहे त्या ठिकाणी कोणत्या संख्या लिहीणार?

२ तुम्ही तुमच उत्तर कसे शोधले?

३ सुरवात कशी केली?

४ कोणत्या ठिकाणी तुम्ही बदल केला?

५ सगळ्यात आधी कोणत्या क्रियेवर जास्त लक्ष दिले?

६ किती वेळा तुम्ही अंकांचे स्थान बदलले?

७ आपल्या सर्व क्रिया बरोबर आल्या आहेत हे कधी समजले?

८ या प्रकारची दुसरी आव्हानात्मक कोडी आपल्या मित्रांसाठी बनवणे आणि लिहिणे.



## ८. असे चालत राहते कोण! (कविता)



नदी मिळते समुद्राला

आणि समुद्राला मिळते कोण?

तलावातील पाणी मडक्यामध्ये

मडक्यामध्ये पाणी भरते कोण?





हवा उडवत राहते सुगंध

आणि हवेसोबत उडत असते कोण?

पाकळ्या बनतात फुल

सकाळी रूप बदलते कोण?

बर्फ वितळतो पाणी बनते

असे अजून वितळते कोण?

हसतो, रडतो,पडतो, उठतो.

पडून पडून सावरते कोण?



STCI and Group Ignus have created this booklet called 'Gammat Jammat' with support from Educo for Home based Foundational Learning during Covid-19 affected times.
Source: Chahak, Manan books, Group Ignus



## खाली काही शब्द दिले आहेत ते तुम्ही योग्य क्रमाने लावा.

- ढग, पाणी, शेत, पाऊस, समुद्र, नाला, नदी, वाफ, दमट, आर्द्रता
- रोप, बी, फळ, फुल, पाने, कळी, फांदी, अंकुर

## कविता लिहा.

मनात येणाऱ्या विचाराना काही विशेष/यमक जुळणाऱ्या शब्दांसोबत रचना करून लिहिल्याने कविता तयार होते. तर चला, अशाच काही शब्दांना घेऊन कविता बनवा.

- आले, खाल्ले, गायले, वाजवले
- केले, हरले, घाबरले, मेले
- लावले, रडले, झोपले, हरवले
- माकड, आत, घाबरवले, पळवले

# ९. माझा दिवस

बाबांची ऑफिसला जाण्याची वेळ आठ वाजता असते त्याच्या पंधरा मिनट अगोदर राजू उठला. उठल्यावर सुरवातीला तो बाबांशी बोलला. बाबा जाऊन दहा मिनट झाली तेव्हा त्याने ब्रश करायला घेतला. राजूला प्रत्येक कामामध्ये खूप वेळ लागायचा.अर्धा तास होण्यासाठी दहा मिनट कमी असे पर्यंत ब्रश करत राहिला. राजूची आई त्याला आवाज देऊ लागली....”राजू ssss आवर लवकर नऊ वाजता ऑनलाईन क्लास सुरु होणार आहे”. राजूने कसेतरी आवरले व तो क्लासला बसला. पंचेचाळीस मिनिटाचे राजूचे ऑनलाईन तीन तास झाले. त्यानंतर राजूने दहा मिनट सांगितलेला अभ्यास लिहून घेतला. त्यानंतर राजूने बारा वाजून तीस मिंनटापर्यंत टीव्ही बघितला. तेव्हा राजूची दीदी कॉलेज मधून घरी आली. राजूला खूप भूक लागली होती. त्याने दीदीला अर्ध्या तासामध्ये आवरून जेवायला यायला सांगितले. त्यानंतर राजू, दीदी व आई यांनी छान गप्पा मारत व टीव्ही वरील शैक्षणिक कार्यक्रम बघत जेवण केले. दोन तासाच्या विश्रांती नंतर दीदी व राजूने अभ्यास केला. नंतर आपल्या मित्रांसोबत राजू बाहेर खेळायला गेला त्याने त्याच्या मित्रांसोबत खूप धमाल केली. दिवे लागण्याच्या वेळेला राजूचे बाबा घरी आले. तेव्हा बाबांना बघून राजू देखील उड्या मारत घरी आला.



## वरील मजकूर वाचून प्रश्नांची उत्तरे वहीत लिहिणे.

१ राजू किती वाजता उठला व त्याने ब्रश कधी केला?

२ अर्धा तास म्हणजे किती मिनट?

३ राजूचा ऑनलाईन क्लास किती तास किती मिनटे चालला?

४ तुम्ही कोण कोणते शैक्षणिक कार्यक्रम बघतात? त्यांचे नावे आणि वेळ सांगा.

५ राजूने जेवण करण्यासाठी किती सेकंद लावले?

६ दिवे लागण्याची वेळ म्हणजे साधारणता कोणती वेळ?

७ तुमची दिनचर्या कशी असते? ते लिहून काढा.

८ पाऊन तास म्हणजे एकून किती मिनट?

## १०. हे काय आहे?

१ या खालील गोष्टी मध्ये उंदीर पळताना काय बोलला असेल, खारुताई काय बोलली असेल?

२ कुत्र्याने हि गोष्ट आपल्या मित्रांना कशी सांगितली असेल? आणि वाघाने कशी सांगितली असेल? काय सांगताना वाघाला हसायला आले असेल? आणि का?

३ सांगा बर यातला कोणता शब्द गोष्टीमध्ये नसेल आला....पळ, थंड, जोरात, झाड, माठ, जीभ, शेपूट, गवत, डोळे, रिबीन, ...असे अजून शब्द तयार करा आणि आपल्या मित्रांना विचारा.






3
4
5
6

## ११ . PARTS OF THE TREE







| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| F | R | U | I | T | S | B | U | P | Q |
| D | M | O | T | P | Q | R | T | B | A |
| U | S | A | B | W | X | Z | R | T | S |
| B | R | A | N | C | H | A | U | V | S |
| M | C | N | L | R | Y | S | N | V | U |
| N | K | X | M | O | Z | T | K | O | W |
| O | B | F | L | O | W | E | R | D | E |
| P | R | S | T | T | H | M | F | T | G |
| Q | J | W | P | S | Q | K | S | P | I |
| L | E | A | V | E | S | F | R | S | J |

**Look at the tree and find out part of a plants and a tree.**
(तक्त्यामधील लपलेले अक्षरे बघून वनस्पती व झाडांचे अवयव काळजीपूर्वक लिहा)

| A Plant | A Tree |
|---|---|
| 1) | 1) |
| 2) | 2) |
| 3) | 3) |
| 4) | 4) |
| 5) | 5) |


श्री सागर गायकवाड
वर्गशिक्षक-इ.दुसरी
हुतात्मा भगतसिंग विद्यामंदिर कन्या ३१ दापोडी, पुणे

## १२ . मी वार्ताहर

बालमित्रांनो, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली, हे तुम्हाला माहिती आहेच. त्यांनी १६४७ मध्ये हा पहिलाच किल्ला घेतला. त्यामुळे तोरण्याला इतिहासात वेगळेच महत्त्व आहे. स्वराज्याचे तोरण बांधल्याने या किल्ल्याला तोरणा नाव पडल्याचे समजले जाते. मात्र, या किल्ल्यावर तोरण जातीची पुष्कळ झाडे आहेत. त्यामुळे किल्ल्याला 'तोरणा' नाव दिल्याचेही मानले जाते. हा किल्ला प्रचंडगड या नावानेही ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रचंड विस्तारामुळे या किल्ल्याला 'प्रचंडगड' हे नाव दिले. अतिदुर्गम व अतिविशाल म्हणून हा किल्ला प्रसिद्ध आहे. पुणे जिल्ह्यातील हा सर्वात उंच किल्ला आहे. किल्ल्याची तटबंदी आजही मजबूत अवस्थेत आहे. त्याचप्रमाणे किल्ल्याला झुंजार आणि बुधला या दोन माच्याही आहेत. यांपैकी झुंजार माचीचा विस्तार छोटा आहे. मात्र, ती चढण्यास खूप अवघड आहे. बुधला माची राजगड आणि तोरण्यादरम्यान पसरलेली आहे. किल्ल्यावर तोरणजाई देवी मंदिर (कोठी दरवाजा), मेंगाई देवी मंदिर, झुंजार माची, तोरणेश्वर महादेवाचे मंदिर आदी प्रेक्षणीय ठिकाणेही आहेत. सह्याद्रीच्या पर्वतरांगेत वसलेल्या या किल्ल्यावर पर्यटक, गिर्यारोहक नेहमीच येतात. मात्र, पुणे जिल्ह्यातील इतर किल्ल्यांच्या तुलनेत तोरणा चढाईला अवघड आहे. त्यामुळे, सुरक्षेची पुरेशी काळजी घ्यायला हवी.



१ वरील बातमी वाचताना तुम्ही कोणत्या गोष्टी जास्त ठळकपणे पाहिल्या?

२ तुम्हाला बातमी लिहायची असेल तर तुम्ही त्यासाठी कोणकोणत्या गोष्टी लक्षात घ्याल?

३ दिलेल्या माहितीच्या आधारे तुम्हाला बातमी पेपर मध्ये द्यायची आहे. त्यासाठी तुम्ही बातमीचे लेखन करा.

- तुमच्या शाळेत इयत्ता सातवीच्या मुलांनी/मुलींनी स्वतः शिक्षक बनून शिक्षकाची भूमिका पार पाडली
- 5 सप्टेंबरला 'शिक्षक दिन' यानिमित्त शाळेतील सर्व शिक्षकांना फुल देऊन त्यांचा गौरव केला.
- मुले/मुली यांनी शिक्षक दिनानिमित्त भाषणे केली.

## १३ . कागद काम – TANGRAM





१- खाली दिलेल्या चित्राला लक्षपूर्वक बघा एका चौकोनी खात्यामधील रेषांना सात खात्यांमध्ये वाटले आहे.

२- आता दिलेल्या चित्रानुसार रेषांवर कापून घ्या तुम्हाला सात तुकडे मिळतील.







या तुकड्यांना एकत्र करून तुम्ही खूप चित्र बनवू शकतात. उदाहरणासाठी तुम्हाला असे दोन चित्र बनवून नमुना म्हणून दिले आहे.





**तुम्ही असे वेगवेगळे चित्र तयार करा आणि चिटकवा.**

STCI and Group Ignus have created this booklet called 'Gammat Jammat' with support from Educo for Home based Foundational Learning during Covid-19 affected times.



Source: Chahak

## १४ . पिण्याचे पाणी





१ तुम्हाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कोठून होतो?

२ तुम्हाला मिळणारे पाणी स्वच्छ असते कि अस्वच्छ? तुम्हाला हे कसे कळते?

३ अस्वच्छ असेल तर ते पाणी स्वच्छ करण्यासाठी तुम्ही काय उपाय कराल?

४ तुम्ही पाणी वाया जाऊ नये म्हणून काय खबरदारी घ्याल?

५ तुम्हाला तुमच्या घरी किंवा घराबाहेर पाणी विनाकारण वाया जाताना दिसले तर काय कराल?

६ सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या नळाला दाबाच्या तोट्या बसविलेल्या असतात, असे का बरे?

**श्री.येळे नागेश रामदास**

**वर्गशिक्षक- इ. चौथी**

**खिंवसरा पाटील मुले प्राथमिक शाळा थेरगाव, पिपरी चिंचवड**

## १५ . बाटलीपासून काय काय?

**प्लास्टिक च्या खूप साऱ्या बाटल्या इकडे तिकडे पडलेल्या असतात. आपण त्यांच्यासोबत काय काय करू शकतो? काही नवीन आणि मजेशीर प्रयोग खाली दिलेले आहेत.**
**कोणत्या कामासाठी किती मोठी बाटली उपयोगी येईल हे तुम्हालाच ठरवायचे आहे.**

१ वरचा भाग सांभाळून कापून टाका. आता खालील् भागात आपण ओली छत्री ठेवू शकतो.

२ जो वरचा भाग कापलेला आहे त्याचा उपयोग भांड्यात ठेवलेलं अन्न, चटणी झाकण्यासाठी करू शकतो.

३ एका बाटली ला खाली छोटे छिद्र करा. बाटलीमध्ये पाणी भरून ते रोपट्या जवळ ठेवा. त्या रोपाला थेंब थेंब पाणी देण्यासाठी बाटलीचा उपयोग होऊ शकतो.

४ बाटलीचा वरचा भाग कापून टाकल्यावर नळी तयार होते - ह्याचा कुठे कुठे प्रयोग करणार?

५ स्प्रिंकलर – एका बाटलीला खाली ७ ते ८ छिद्रे करा. आता याला एक नळी जोडा. जेथे नळी बाटलीच्या तोंडाला लागली असेल तेथे TAPE, चिकट पट्टी लावून घ्या. कारण कि पाणी वाया नाही जाणार. चला झाले तयार तुमचे स्प्रिंकलर ....

६ जुन्या प्लास्टिक बाटलीपासून अजून काही गोष्टी तयार होऊ शकतात. पण यासाठी उपाय किंवा युक्ती तुम्हालाच शोधायची आहे. खाली तुम्हाला काही उदाहारणे दिली आहेत ते तुम्ही बनवा आणि आम्हाला फोटो पाठवा.

- मोबाईल ठेवायचे STAND
- खोका
- (चमचा) – पण याच्या किनार ला गरम करून तो भाग सपाट करावा लागेल, नाहीतर हाताला लागू शकते .

## १६. “सात शेपट्यांचा उंदीर” (गोष्ट)



**जर मुले स्वतःहून वाचू शकतील, तर त्यांना खाली दिलेली गोष्ट वाचायला सांगा.**

एक उंदीर होता. त्याला सात शेपूट होते. सर्व त्याला चिडवत होते.”सात शेपट्यांचा उंदीर,”सात शेपट्यांचा उंदीर! ”उंदीर चिडला होता. तो गेला न्हाव्याजवळ. त्याने न्हाव्याला म्हटले, “माझी एक शेपूट कापून टाक.” न्हाव्याने एक शेपूट कापून टाकले.दुसर्या दिवशी उंदीर जेव्हा बाहेर निघाला, तेव्हा परत त्यला सर्व चिडवायला लागले. “सहा शेपट्यांचा उंदीर, सहा शेपट्यांचा उंदीर!” उंदीर परत कंटाळून गेला आणि न्हाव्याजवळ गेला.त्याने न्हाव्याला म्हटले, “माझी अजून एक शेपूट कापून टाक”. न्हाव्याने शेपूट कापून टाकले.

पण परत दुसऱ्या दिवशी त्याला सर्व चिडवायला लागले. “पाच शेपट्यांचा उंदीर, पाच शेपट्यांचा उंदीर”, ...उंदीर परत खूप कंटाळून गेला. तो न्हाव्याजवळ परत गेला. त्याने न्हाव्याला म्हटले, “ए न्हावी दादा माझी अजून एक शेपूट कापून टाक”. न्हाव्याने अजून एक शेपूट कापून टाकले आता उंदराजवळ फ़क़्त चार शेपूट बाकी होते.

पुन्हा एके दिवशी त्याला परत सर्व चिडवायला लागले. “चार शेपट्यांचा उंदीर, चार शेपट्यांचा उंदीर”. उंदीर परत एकदा खूप कंटाळून गेला आणि तो न्हाव्याजवळ परत गेला त्याने न्हाव्याला म्हटले, “ए न्हावी दादा माझी अजून एक शेपूट कापून टाक”. न्हाव्याने अजून एक शेपूट कापून टाकले आता उंदराजवळ फ़क़्त तीन शेपूट बाकी होते.

पण त्याल परत एकदा सर्व चिडवायला लागले “तीन शेपट्यांचा उंदीर तीन शेपट्यांचा उंदीर”. उंदीर परत एकदा खूप कंटाळून गेला आणि तो न्हाव्याजवळ परत गेला त्याने न्हाव्याला म्हटले, “ए न्हावी दादा माझी अजून एक शेपूट कापून टाक”. न्हाव्याने अजून एक शेपूट कापून टाकले आता उंदराजवळ फ़क़्त दोन शेपूट बाकी होते.

पण परत दुसऱ्या दिवशी त्याला सर्व चिडवायला लागले. “दोन शेपट्यांचा उंदीर, दोन शेपट्यांचा उंदीर” ,... उंदीर परत खूप कंटाळून गेला आणि तो न्हाव्याजवळ परत गेला त्याने न्हाव्याला म्हटले, “ए न्हावी दादा माझी एक शेपूट कापून टाक”. न्हाव्याने अजून एक शेपूट कापून टाकले आता उंदराजवळ फ़क़्त एक शेपूट बाकी होते.

पण त्याला सर्व चिडवायला लागले. "एक शेपट्यांचा उंदीर,एक शेपट्यांचा उंदीर",... उंदीर यावेळी खूप चिडलेला होता आणि तो न्हाव्याजवळ परत गेला त्याने न्हाव्याला म्हटले, "ए न्हावी दादा माझी हि शेवटची शेपूट पण कापून टाक". न्हाव्याने शेपूट कापून टाकले आता उंदराजवळ एकही शेपूट बाकी नव्हते.

पण तरी सुद्धा त्याला सर्व चिडवत होते, "बिना शेपटीचा उंदीर - बिना शेपटीचा उंदीर - बिना शेपटीचा उंदीर...."

## काय झाले असते ......

१ प्राण्यांना शेपूट का असते?

२ जर ....हत्तीला चार सोंड असते तर....काय झाले असते?

३ जर ....माकडाला तीन शेपूट असते तर...काय झाले असते?

४ जर.....वाघाची मान खूप खूप लांब असती तर ....काय झाले असते?

५ तुम्ही जर उंदराच्या जागी असते,तर काय झाले असते?

६ बिना शेपटीच्या उंदराचे आता काय होईल?

## १७ . केव्हा काय बोलायचे?





मोहिनी खूप दिवसापसुन एक चित्र बनवत होती. खूप मेहनत घेऊन तीने सात दिवसात या चित्राला पूर्ण केले. तिने काढलेले चित्र तिला लवकरात लवकर आपल्या मित्रांना दाखवायचे होते. तिला खूप आनंद झाला कि तिने ते चित्र पूर्ण केले. त्याच आनंदाने ती ते चित्र घेऊन तिच्या मित्र-मैत्रिणींकडे गेली जिथे ते सगळे खेळत होते. मोहिनीच्या हातामध्ये चित्र बघून सगळे तिच्या अवतीभोवती जमा झाले. मोहिनी त्यांच्या चेहऱ्याकडे बघू लागली. मुले चित्रा विषयी वेगवेगळी चर्चा करू लागली.
सविता बोलली वाह... मोहिनी काय सुंदर चित्र बनवले आहे
इरफान म्हणाला, 'मोहिनी याला पूर्ण करायला किती दिवस लागले तुला? खूप मेहनत केली असणार तु तेव्हाच तर चित्र छान झाले आहे.

त्यानंतर कमल म्हणाली,
'काय खराब चित्र आहे,
या पेक्षा चांगले तर मी एका तासामध्ये काढेल.'
त्यावर मोहिनी काय बोलणार इतक्यात सविता, इरफान आणि तिथे असणारी इतर मुले देखील कमल वर ओरडायला लागली व म्हणाली कि
'तुला असे बोलायला नाही पाहिजे'.
'तु इतका घमंड का करतेस ग ?'
'कोणाच्या मेहनतीवर आपण असे बोलणे योग्य आहे का?'



१) तुम्हाला काय वाटते? तुम्ही जर तिथे असता तर मोहिनीला काय बोलला असता?

२) आता खाली दिलेल्या मुलांविषयी देखील विचार करा आणि लिहा कि तुम्ही या लोकांना भेटल्यावर काय बोलणार?

अ] तुमचा एखादा मित्र/मैत्रीण जो एखाद्या खेळात हारून आला/आली आहे.

ब] एखादा मित्र/ मैत्रीण आताच दवाखान्यातून बरा होऊन घरी आला/आली आहे.

क] तुमच्या एखादा मित्र/मैत्रीण सोबत दुर्घटना घडली आहे

ड] एखाद्या मित्राने तुमचे – छानसे खेळणे तोडले आहे,

– तुमच्या आवडीचा पदार्थ बनवून आणला आहे,

– तुम्हाला कलर पेन्सिल / खेळणी वापरायला दिली आहेत,

अश्या वेळी तुम्ही काय बोलाल?





**माझे नाव** ------------------------------------------------------------------------

**इयत्ता** ------------------------------------------------------------------------

| क्र . | कृतीचे नाव | काय शिकलात? | काय आवडले? | काय अडचणी आल्या? | तुमचे मत | पूर्ण झाले | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ओळखा पाहू मी कोण? | | | | | | |
| २ | चला धावा | | | | | | |
| ३ | A LONG RIDE | | | | | | |
| ४ | सरळ च्या उलट | | | | | | |
| ५ | LETTER MATHS – गणिताचा खेळ | | | | | | |

STCI and Group Ignus have created this booklet called 'Gammat Jammat' with support from Educo for Home based Foundational Learning during Covid-19 affected times.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | आकार वचित्रांची मज्जा | | | | | | | |
| ७ | गणिताची डोकेबाजी | | | | | | | |
| ८ | असे चालत राहते कोण? | | | | | | | |
| ९ | माझा दिवस | | | | | | | |
| १० | हे काय आहे? | | | | | | | |
| ११ | PARTS OF THE TREE | | | | | | | |
| १२ | मी वार्ताहर | | | | | | | |
| १३ | कागद काम | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | पिण्याचे पाणी | | | | | | |
| १५ | बाटली पासून काय काय? | | | | | | |
| १६ | सात शेपट्यांचा उंदीर | | | | | | |
| १७ | केव्हा काय बोलायचे ? | | | | | | |

## पालकांचे आभार

गम्मत जंमत पुस्तिका मुलांना समजावून सांगण्यामध्ये, मुलांना पुस्तिका सोढविण्यासाठी वेळोवेळी सर्व पालकांनी सहकार्य केले. त्या बद्दल सर्व पालकांचे खूप खूप धन्यवाद व आशा करतो कि यापुढेहि तुम्हचे सहकार्य असेच लाभेल.

IN COLLABORATION WITH

SF9, G Block, Adjacent to American School of Bombay,
Bandra - Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400098, Tel.: +91 22 2652 0601 / 02

www.savethechildrenindia.org